**नि.फौ.ख.क्र. ५५/२०१४**
सरकार – वि.- सददाम शेख व ईतर
**निशाणी क्र. ४२**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – शहाबुददीन मौलाली नदाफ - पंच
वय – ४२ वर्षे, व्यवसाय – व्यापार,
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-**

दि. १०/०२/२०१४ रोजी मला पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बगाडे साहेबांनी पंचनाम्याकामी बोलवले होते. मी तेथे गेलो तेव्हा एक व्यक्ती पोलीसांच्या अटकेत होता. पोलीसांनी माझे समक्ष त्याची अंगझडती घेतली. आरोपीने त्याचे नाव महेश असे सांगितले होते. पोलीसांना अंगझडतीत काही सापडले नाही, परंतु आरोपीच्या अंगावर डोक्यापासुन पायापर्यंत जुने घाव होते. पोलीसांनी आरोपीस अटक करुन त्याच्या आईला कळवले. माझे सोबत दुसरा पंच विष्णु जावगडे हा होता. आता मला अटक पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी, दुसरा पंच विष्णु व पोलीस बगाडे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. ४३** देण्यात येतो. मी आरोपीला आज पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.02.26 17:11:54 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २६/०२/२०२६